.nagpur

# NMC e NEWS LETTER

जुलै २०१९

/nmcngp/ /ngpnmc/ www.nmcnagpur.gov.in/ http://news.nmcnagpur.org/

## थोडक्यात...



### सफाई कामगारांना स्थायी नियुक्ती आदेशाचे महापौरांचा हस्ते वितरण

लाड पागे समिती शिफारसींतर्गत ११९ कर्मचाऱ्यांची नियुक्ती

नागपूर महानगरपालिकेमधील ११९ सफाई कर्मचाऱ्यांना लाड–पागे समितीच्या शिफारशींतर्गत स्थायी नियुक्ती आदेशाचे वितरण बुधवारी (ता.२४) महापौर नंदा जिचकार, प्रभारी आयुक्त रवींद्र ठाकरे यांच्या हस्ते करण्यात आले. सफाई कर्मचारी म्हणून संगीता हाटे, ज्योती राऊत, करुणा गजभिये, मोनिका खुटे, आम्रपाली बिहाडे, मोहित वाडीभस्मे, अमित चिमोटे, रूपेश चिमोटे आदी सफाई कर्मचाऱ्यांच्या वारसांना प्रातिनिधिक स्वरूपात नियुक्ती आदेश प्रदान करण्यात आले असून उर्वरित कर्मचाऱ्यांना आरोग्य विभागातर्फे आदेश निर्गमित करण्यात येणार आहे..

### शहराच्या यशात सफाई कर्मचाऱ्यांचे योगदान महत्वाचे : महापौर नंदा जिचकार



आज आपल्या नागपूर शहराचे नाव देशात सन्मानाने घेतले जाते. नागपूर शहर स्वच्छ, सुंदर होत आहे. शहराला अनेक पुरस्कारही मिळाले आहेत. शहराला मिळणाऱ्या या यशामध्ये सफाई कर्मचाऱ्यांचे महत्त्वाचे योगदान आहे. आपले शहर स्वच्छ, सुंदर राहावे यासाठी शहरातील घाण साफ करण्याचे मौलिक कार्य हे सफाई कर्मचारी करतात. त्यामुळे शहराच्या प्रत्येक यशामध्ये या सफाई कर्मचाऱ्यांचे योगदान मोठे आहे, असे प्रतिपादन महापौर नंदा जिचकार यांनी यावेळी केले. कार्यक्रमाचे संचालन राजेश लव्हारे यांनी केले.

### उत्पादनांच्या विक्रीकरीता 'सुपर ३०' महिलांचा पथदर्शी प्रकल्प

महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी मनपा च्या पुढाकाराला मदर डेअरीने सहकार्य दर्शविले असून मदर डेअरी च्या उत्पादन विक्रीमधून महिलांना आर्थिक उन्नतीचा पथदर्शी प्रकल्प राबविण्यात येत आहे. या प्रकल्पासाठी प्रायोगीक तत्वावर ३० महिला सदस्यांची 'सुपर ३०' चमुची निवड करण्यात आली आहे. गुरूवारी (ता.२५) मनपा मुख्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृती स्थायी समिती सभागृहात यासंबंधी बैठक घेण्यात आली. नागपूर महानगरपालिकेच्या दीनदयाल अंत्योदय योजना– राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान व आणि मदर डेअरी यांच्या संयुक्त विद्यमाने स्वयं सहाय्यता महिला बचत गटातील महिलांना स्वयं रोजगार मिळावा म्हणून मदर डेअरीच्या उत्पादन विक्रीचा पथदर्शी प्रकल्प राबविण्यात येणार आहे. मदर डेअरीद्वारे तयार करण्यात येणा–या दुध, दही, मिस्टी दही, लस्सी, ताक, बटर, पनीर, चीज, मध, तुप, खाद्य तेल, आईसक्रीम, मटर, हराभरा कबाब, आलु टिक्की, फ्रेंच फ्राईज, स्वीट कॉर्न, टोमॅटो प्युरी, फणस, मिल्क शेक इत्यादी उत्पादनांची विक्री महिला सदस्यांमार्फत ग्राहकांच्या घरपोच सेवा उपलब्ध करून देण्यात येईल .यासाठी बैठकीत ३० महिला सदस्यांची निवड करण्यात आली. निवड करण्यात आलेल्या सदस्यांना मनपा व मदर डेअरीतर्फे ओळखपत्र देण्यात येणार आहे.

### 'सेव्ह वाटर, हार्वेस्ट वाटर' समिती होणार गठीत

महापौर नंदा जिचकार म्हणाल्या, पावसाच्या पाण्याचे संचय करणे ही काळाची गरज असून यासाठी 'रेन वाटर हार्वेस्टिंग'चे कार्य सर्वांनी हाती घेणे आवश्यक आहे. कोणत्याही इमारतीचे बांधकाम अथवा परिसराचा विकास करताना छतावरील पाण्याचे संचय करण्याची शहराच्या विकास नियंत्रण नियमावलीमध्ये तरतूद आहे. मात्र याला विकासक, नागरिकांकडून प्रतिसाद मिळत नाही. जलसंवर्धन हे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य असून 'रेन वाटर हार्वेस्टिंग' ही चळवळ होणे आवश्यक आहे. यासाठी मोठ्या प्रमाणात जनजागृती करण्यात यावी. नागरिकांना 'रेन वाटर हार्वेस्टिंग'चे महत्व पटवून देण्यात यावे. यासाठी नागपूर महानगरपालिकेतर्फे 'सेव्ह वाटर, हार्वेस्ट वाटर' समिती गठीत करण्यात येणार असून जनजागृतीसाठीही विशेष कार्यक्रम हाती घेण्यात येणार असल्याचे यावेळी महापौर नंदा जिचकार यांनी सांगितले.नागपूर महानगरपालिका जलसंवर्धनाबाबत कार्यरत असून महापौरांनी सर्व नगरसेवकांकडून 'रेन वाटर हार्वेस्टिंग' प्रणाली लावण्याबातचे प्रस्ताव मागविले आहेत. विशेष म्हणजे, या कार्यासाठी महापौर नंदा जिचकार महापौर निधीही देणार आहेत.

# 'इंटर्नशीप आणि मेंटॉरशीप'साठी जी–कॉम करणार सहकार्य




## संचालक मंडळाचे सदस्य 'महापौर इनोव्हेशन अवॉर्ड' संकल्पनेने प्रभावित

नागपुरात 'महापौर इनोव्हेशन अवॉर्ड'च्या निमित्ताने विद्यार्थ्यांनी शहर विकासासाठी मांडलेल्या नवनवीन कल्पना प्रत्यक्षात आणण्याकरिता नागपूर महानगरपालिकेने अर्थसंकल्पात विशेष तरतूद केली. हा उपक्रम शाश्वत विकासाच्या दृष्टीने मैलाचा दगड ठरणार आहे. या उपक्रमाने जी–कॉमचे संचालक मंडळ प्रभावित झाले असून या उपक्रमाच्या माध्यमातून आलेल्या आणि भविष्यात येणाऱ्या संकल्पनांच्या प्रभावी अंमलबजावणीच्या दृष्टीने ग्लोबल कोव्हेनन्ट ऑफ मेयर्स (जीकॉम) इंटर्नशीप आणि मेंटॉरशीपसाठी सहकार्य करणार आहे.महापौर नंदा जिचकार ह्या ग्लोबल कोव्हेनन्ट ऑफ मेयर्स (जीकॉम) या परिषदेवर दक्षिण आशियातून एकमेव बोर्ड सदस्य आहेत. २६ आणि २७ जून रोजी जीकॉमच्या संचालक मंडळाची बैठक फ्रान्समधील पॅरिस या शहरात पार पडली. बैठकीला जीकॉम संचालक मंडळाचे अध्यक्ष मिशेल ब्ल्यूम्बर्ग (Michael Bloomberg), मॅरॉस सेफ्कोविक (Maros Sefcovic), क्रिस्टियाना फिग्युरेस (Christiana Figueres) यांच्यासह घानामधील आक्रा या शहराचे महापौर महंमद डजेई सोव्हा (Mohd. djei Sowh), मोरोक्कोच्या शेफ चोहोहीन शहराचे महापौर महंमद सिफेनी (Mohd. Sefiani), जर्मनीच्या हिडलबर्ग शहराचे महापौर ईकार्ट व्हुर्जनर (Eckart Wurzner), भारतातील नागपूर या शहराच्या महापौर नंदा जिचकार (Nanda Jichkar), फ्रान्समधील पॅरिस शहराच्या महापौर नी हिडाल्गो (nne Hidalgo), यूएसएच्या पिटस्बर्ग शहराचे महापौर बिल पिडुटो (Bill Peduto), जीकॉमच्या कार्यकारी संचालक अमान्डा ईचेल (manda Eichel) यांची उपस्थिती होती. जीकॉम संचालक मंडळाच्या बैठकीत पर्यावरण आणि ऊर्जा या विषयावर पुढील १२ महिन्यात आयोजित विविध उपक्रमांमध्ये जीकॉमच्या सहभागाविषयी नियोजन करण्यात आले. पुढील वर्षभरात सी–४० मेअर्स समीट (C-40 Mayors Summit), सेऊल मेअर फोरम (Seoul Mayors Forum), यूसीएलजी वर्ल्ड कॉंग्रेस (UCLG World Congress), कॉप–२५ (Cop-25) असे विविध आयोजन असून यामध्ये जीकॉम सहभागी होणार आहे. या संपूर्ण उपक्रमातील सहभागासंदर्भात धोरणात्मक निर्णय यावेळी घेण्यात आले. जीकॉम सहभागी होणाऱ्या उपक्रमातील विषयांच्या प्राथमिकता यावेळी ठरविण्यात आल्या. यामध्ये प्रामुख्याने इनोव्हेट फॉर सिटीज (Innovate4Cities), डाटा फॉर सिटीज (Data4Cities), इन्व्हेस्ट फॉर सिटीज (Invest4Cities) या मुद्यांवर चर्चा करण्यात आली. इनोव्हेट फॉर सिटीज अंतर्गत मिशन इनोव्हेशन पार्टनरशीप (Mission Innovation Partnership), स्टुडंट एनर्जी पार्टनरशीप (Student Energy Partnership), सिटीज ण्ड क्लायमेट सायन्स कॉन्फरन्स (Cities Climate Sceince Conference), रिसर्च ण्ड इनोव्हेशन टेक्नीकल (Research Innovation Technical) आदीं विषयांना प्राधान्य देण्यात येणार आहे. व्यावसायिकदृष्ट्या शहराची डाटा सिस्टीम तयार करण्यावरही भर देण्यात येणार आहे. संचालक मंडळाच्या या बैठकीत नागपूरच्या महापौर नंदा जिचकार यांनी दक्षिण आशियाचे प्रतिनिधित्व केले. नागपूर शहरात शाश्वत विकासाच्या दृष्टीने पर्यावरण आणि ऊर्जा या क्षेत्रात सुरू असलेल्या कार्याची माहिती दिली. महापौर इनोव्हेशन अवॉर्डबाबत माहिती देत उपक्रमाची चित्रफीत दाखविली आणि सादरीकरण केले. या उपक्रमाअंतर्गत विद्यार्थ्यांच्या माध्यमातून अनेक नवनवीन संकल्पना मांडण्यात आल्या. त्याचा उपयोग शहर विकासात करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. याची अंमलबजावणी अधिक प्रभावीपणे व्हावी यासाठी जीकॉमने सहकार्य करावे, अशी विनंतीही महापौर नंदा जिचकार यांनी यावेळी केली.

# नागपुरातील 'इलेक्ट्रिक चार्जींग स्टेशन' प्रकल्प पथदर्शी: महापौर नंदा जिचकार

## इलेक्ट्रिक चार्जींग स्टेशनचे उद्घाटन : लवकरच होणार दरनिश्चिती

कविवर्य सुरेश भट सभागृहात निर्मित इलेक्ट्रिक वाहन चार्जींग स्टेशन हा पथदर्शी प्रकल्प आहे. सभागृहात सौर ऊर्जा निर्माण करून त्या माध्यमातून चार्जींग स्टेशनद्वारे इलेक्ट्रिक वाहने चार्ज करणे, अशी संकल्पना केवळ ना. नितीन गडकरीच मांडू शकतात, अशा शब्दात गौरव करीत महापौर नंदा जिचकार यांनी नागपुरात होत असलेल्या चौफेर विकासकामांवर प्रकाश टाकला.रेशीमबाग येथील कविवर्य सुरेश भट सभागृहात निर्माण करण्यात आलेल्या इलेक्ट्रिक चार्जींग स्टेशनच्या उद्घाटनप्रसंगी त्या बोलत होत्या. उद्घाटक म्हणून पुढे बोलताना महापौर नंदा जिचकार म्हणाल्या, विकासाची व्याख्या आता बदलली आहे. केवळ सिमेंट रस्ते अथवा पूल बांधणे म्हणजे विकास नाही. विकास शाश्वत असायला हवा. नागपूर शहर आता शाश्वत विकासाच्या दृष्टीने पुढे चालले आहे. नागपुरात तयार झालेले इलेक्ट्रिक चार्जींग स्टेशन हा शाश्वत विकासाचा पथदर्शी प्रकल्प आहे. अशा पथदर्शी प्रकल्पांमुळे वेगाने शाश्वत विकास होत असलेल्या जगातील प्रमुख पाच शहरांमध्ये नागपूरचे नाव असल्याचे त्यांनी सांगितले. वायुप्रदुषणामुळे अनेक आजार होतात. शुद्ध हवा मिळण्यासाठी ना. नितीन गडकरी यांच्या नेतृत्वात नागपूर महानगरपालिका अनेक प्रकल्प राबवित असून त्यासाठी मनपा कटिबद्ध असल्याचे त्यांनी सांगितले.याप्रसंगी बोलताना आमदार सुधाकर कोहळे म्हणाले, इलेक्ट्रिक चार्जींग स्टेशनचे उद्घाटन ही शहरासाठी अभिमानाची बाब आहे. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी मांडलेली संकल्पना साकार करण्याकरिता मनपाने जो पुढाकार घेतला, त्याबद्दल त्यांनी मनपाचे कौतुक केले. भविष्यात नागपूर शहरातून पेट्रोल–डिझेलच्या गाड्या बाद होऊन इलेक्ट्रिक अथवा बॅटरी ऑपरेटेड वाहने चालतील, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला. तत्पूर्वी महापौर नंदा जिचकार यांच्या हस्ते इलेक्ट्रिक चार्जींग स्टेशनचे फीत कापून उद्घाटन करण्यात आले. इलेक्ट्रिक बस चार्जींग करण्याअगोदर महापौर नंदा जिचकार व अन्य मान्यवरांनी पूजन केले. इलेक्ट्रिक चार्जींग स्टेशन उभारणाऱ्या एम.एम. सोलर प्रा.लि.चे देवेंद्र रानडे आणि श्याम रानडे यांचा महापौरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे संचालन गिरीश देशमुख यांनी केले. आभार अतिरिक्त आयुक्त राम जोशी यांनी मानले. या सर्व चार्जिंग स्टेशनवर वाहनांची चार्जिंगची सोय करण्यात आली आहे. या सर्व चार्जिंगचे दर लवकरच निश्चित करण्यात येणार आहे.



# महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी मनपा व मदर डेअरीचा पुढाकार

महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी मनपा च्या पुढाकाराला मदर डेअरीने सहकार्य दर्शविले असून मदर डेअरी च्या उत्पादन विक्रीमधून महिलांना आर्थिक उन्नतीचा पथदर्शी प्रकल्प राबविण्यात येत आहे. या प्रकल्पासाठी प्रायोगीक तत्वावर ३० महिला सदस्यांची 'सुपर ३०' चमुची निवड करण्यात आली आहे. गुरूवारी (ता.२५) मनपा मुख्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृती स्थायी समिती सभागृहात यासंबंधी बैठक घेण्यात आली. नागपूर महानगरपालिकेच्या दीनदयाल अंत्योदय योजना– राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान व आणि मदर डेअरी यांच्या संयुक्त विद्यमाने स्वयं सहाय्यता महिला बचत गटातील महिलांना स्वयं रोजगार मिळावा म्हणून मदर डेअरीच्या उत्पादन विक्रीचा पथदर्शी प्रकल्प राबविण्यात येणार आहे. मदर डेअरीद्वारे तयार करण्यात येणा–या दुध, दही, मिस्टी दही, लस्सी, ताक, बटर, पनीर, चीज, मध, तुप, खाद्य तेल, आईसक्रीम, मटर, हराभरा कबाब, आलु टिक्की, फ्रेंच फ्राईज, स्वीट कॉर्न, टोमॅटो प्युरी, फणस, मिल्क शेक इत्यादी उत्पादनांची विक्री महिला सदस्यांमार्फत ग्राहकांच्या घरपोच सेवा उपलब्ध करून देण्यात येईल .यासाठी बैठकीत ३० महिला सदस्यांची निवड करण्यात आली. निवड करण्यात आलेल्या सदस्यांना मनपा व मदर डेअरीतर्फे ओळखपत्र देण्यात येणार आहे. या सदस्यांमार्फत मदर डेअरीचे संबंधित उत्पादन घेऊन नागरिकांना घरपोच विक्री करण्यात येणार आहे. या प्रकल्पाद्वारे नागरिकांना घरपोच उच्च प्रतीचे दैनंदिन उपयोगाचे उत्पादनांचा लाभ मिळणार आहे. महिलांचे आर्थिक सक्षमीकरण करून जास्तीत जास्त महिलांना रोजगार मिळवून देण्याच्या उद्देशाने सदर उपक्रम राबविण्यात येत आहे. सद्या प्रायोगिक तत्वावर ३० महिलांची निवड करण्यात आली असून पुढे जास्तीत जास्त महिलांना याचा लाभ मिळवा यासाठी मनपातर्फे प्रयत्न करण्यात येणार आहे. या प्रकल्पामध्ये सहभागी होण्याकरिता इच्छूकांना सर्व झोनच्या समाजकल्याण विभागात संपर्क साधता येईल.

# राष्ट्रीय स्पर्धेमध्ये मनपाच्या विद्यार्थ्यांची चमकदार कामगिरी

## महापौरांच्या हस्ते खेळाडू सन्मानित : लांब उडी, थाळी फेक, गोळा फेक स्पर्धेत प्रथम क्रमांक



नॅशनल स्पोर्ट्स ण्ड फिजिकल फिटनेस बोर्डच्या वतीने राजस्थानमधील अजमेर येथे आयोजित नॅशनल स्पोर्ट्स ण्ड फिजिकल फिटनेस चॅम्पियनशीपमध्ये नागपूर महानगरपालिकेच्या विद्यार्थ्यांनी चमकदार कामगिरीचे प्रदर्शन केले. स्पर्धेमध्ये मनपाच्या वाल्मिकीनगर हिंदी माध्यमिक शाळेच्या पाच विद्यार्थ्यांनी लांब उडी, थाळी फेक, गोळा फेक प्रकारात प्रथम क्रमांक पटकावून राष्ट्रीय पातळीवर मनपाचे नाव लौकीक केले आहे.राष्ट्रीय स्पर्धेमध्ये प्रथम स्थान पटकाविणा–या पूनम पवार (थाळी फेक), विशाल रावत (लांब उडी), संजना ठाकुर (लांब उडी), भेषज वैष्णव (गोळा फेक) व रघुराज तिवारी (लांब उडी) या पाचही खेळाडूंसह प्रशिक्षक नितीन भोळे व मुख्याध्यापिका संध्या मेडपल्लीवार यांचा शुक्रवारी (ता.१९) महापौर नंदा जिचकार यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. महापौर कक्षामध्ये आयोजित कार्यक्रमात शिक्षण समिती सभापती दिलीप दिवे, क्रीडा समिती सभापती प्रमोद चिखले, शिक्षण समिती उपसभापती प्रमोद तभाने, आरोग्य समिती उपसभापती नागेश सहारे, उपनेत्या वर्षा ठाकरे, ज्येष्ठ नगरसेवक सुनील अग्रवाल, नगरसेवक सुनील हिरणवार, नगरसेविका वंदना भगत, शिक्षणाधिकारी प्रिती मिश्रीकोटकर, वाल्मिकीनगर हिंदी माध्यमिक शाळेच्या मुख्याध्यापिका संध्या मेडपल्लीवार, अशोक वायकुळे, माधुरी धवड, क्रीडा अधिकारी नरेश सवाईथूल, क्रीडा निरीक्षक नरेश चौधरी आदी उपस्थित होते. यावेळी महापौर नंदा जिचकार यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना विजयी पदक, प्रमाणपत्र व तुळशीचे रोपटे देउन सन्मानित करण्यात आले. स्पर्धेमध्ये ही खरी सुरूवात असून पुढे अनेक मोठ्या स्पर्धांसह आंतरराष्ट्रीय पातळीवर शहराचे व आपल्या मनपाच्या शाळेचे नाव लौकीक करण्यासाठी सज्ज व्हा, असे आवाहन करीत महापौरांनी विजेत्या खेळाडूंचे अभिनंदन करून पुढील स्पर्धांसाठी शुभेच्छा दिल्या. अजमेर येथील पटेल स्टेडियम येथे १२ ते १४ जुलै या कालावधीमध्ये झालेल्या नॅशनल स्पोर्ट्स ण्ड फिजिकल फिटनेस चॅम्पियनशीपसाठी मनपाच्या वाल्मिकीनगर हिंदी माध्यमिक शाळेतील पाच विद्यार्थी पात्र ठरले होते. यापैकी पाचही विद्यार्थ्यांनी प्रथम क्रमांक पटकावून बाजी मारली. स्पर्धेत पूनम पवारने मुलींच्या १४ वर्षाखालील वयोगटात थाळी फेक प्रकारात (१३.५ मीटर), विशाल रावतने मुलांमध्ये १४ वर्षाखालील वयोगटात उंच उडी प्रकारात (४.१ मीटर), मुलींच्या १७ वर्षाखालील वयोगटातून संजना ठाकुरने लांब उडीमध्ये (४.७ मीटर), १७ वर्षाखालील वयोगटात मुलांच्या गोळा फेकमध्ये भेषज वैष्णव (४.९ मीटर) आणि लांब उडीमध्ये रघुराज तिवारी (५.२ मीटर) या खेळाडूंनी उत्कृष्ट कामगिरीच्या बळावर प्रथम क्रमांकावर मोहोर उमटविली. स्पर्धेसाठी सर्व खेळाडूंना प्रशिक्षक नितीन भोळे व मनोज यादव यांचे विशेष मार्गदर्शन लाभले. सर्व विजेत्या खेळाडूंचे मान्यवरांनी अभिनंदन करून पुढील स्पर्धांसाठी शुभेच्छा दिल्या.

# मनपा शाळांतील विद्यार्थ्यांनी बघितला 'सुपर ३०'



विपरीत परिस्थितीतील ३० मुलांचे शैक्षणिक आव्हान स्वीकारून त्यांना उच्चपदावर नेण्याची जबाबदारी स्वीकारणाऱ्या शिक्षकांची प्रेरणाकथा असलेला हृतिक रोशन अभिनित 'सुपर ३०' हा चित्रपट सदरमधील बुटी सिनेप्लेक्स मध्ये ३०० विद्यार्थ्यांनी बघितला .नागपूर महानगरपालिकेच्या शिक्षण विभागाच्या वतीने सनजेंटस आणि मॉम्स प्रॉडक्शनच्या सहकार्याने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. बुटी सिनेप्लेक्स येथे दुपारी १२ वाजता हा चित्रपट दाखविण्यात आला. तत्पूर्वी आयोजित कार्यक्रमाला महापौर नंदा जिचकार, नगरसेविका परिणिता फुके, शिक्षणाधिकारी प्रिती मिश्रीकोटकर, सहायक शिक्षणाधिकारी राजेंद्र सुके, सहायक कार्यक्रम अधिकारी धनलाल चौलीवार, शिक्षण विभागाचे विनय बगले, आर.जे. सौरभ, मॉमस प्रॉडक्सशनचे सनी फ्रान्सीस, यश दस्तुर, अरविंदर कौर, कौशिक जोशी, संध्या पवार, प्रतिभा दिवाटे यावेळी उपस्थित होते. यावेळी महापौर नंदा जिचकार म्हणाल्या, या देशात झालेले सर्व महापुरुष हे त्यांच्या बालपणी सामान्यच होते. मात्र विपरीत परिस्थितीतही कुशाग्र बुद्धीमत्ता आणि मेहनतीच्या बळावर त्यांनी आपले महानपण सिद्ध केले. आपण आपल्यात जिद्द बाळगली आणि त्या दिशेने मेहनत केली तर सारे काही शक्य आहे, असा मंत्र त्यांनी यावेळी विद्यार्थ्यांना दिला.

# बसपा पक्षनेते म्हणून वैशाली नारनवरे यांनी स्वीकारला पदभार

नागपूर महानगरपालिकेच्या इतिहासात कुठल्या पक्षाच्या नेतेपदी महिलेची वर्णी लागणे हे क्वचितच होते. बसपाच्या पक्षनेतेपदी वैशाली नारनवरे या महिला नगरसेविकेची निवड करून बहुजन समाज पार्टीने नवा पायंडा घातला आहे. पक्षनेतेपदी महिलेची निवड ही गौरवाची बाब असून त्यांच्या कार्यकाळात निश्चित चांगले कार्य होईल, असा विश्वास महापौर नंदा जिचकार यांनी व्यक्त केला. नागपूर महागरपालिकेच्या बसपा पक्षनेतेपदाचा पदभार नगरसेविका वैशाली नारनवरे यांनी गुरुवारी (ता. १८) स्वीकारला. याप्रसंगी त्या बोलत होत्या. अध्यक्षस्थानी बसपाचे प्रदेशाध्यक्ष सुरेश साखरे होते. प्रमुख पाहुणे म्हणून बसपाचे प्रदेश महासचिव जितेंद्र म्हैसकर, मंगेश ठाकरे, जितेंद्र घोडेस्वार, प्रदेश सचिव भाऊसाहेब गोंडाणे, जिल्हाध्यक्ष विलास सोमकुंवर, माजी गटनेता गौतम पाटील, मुरली मेश्राम, प्रदेश मीडिया प्रभारी उत्तम शेवडे, भाईचारा समितीचे शहर अध्यक्ष त्रिभुवन तिवारी, आशीनगर झोन सभापती विरंका भिवगडे, नगरसेविका वंदना चांदेकर, मंगला लांजेवार, ममता सहारे, नगरसेवक नरेंद्र वालदे, संजय बुर्रेवार, उत्तर नागपूर अध्यक्ष अविनाश नारनवरे, माजी जिल्हा प्रभारी योगेश लांजेवार उपस्थित होते. नवनियुक्त पक्षनेता वैशाली नारनवरे म्हणाल्या, पक्षाने आपल्यावर जो विश्वास टाकला त्या विश्वासाला तडा जाऊ देणार नाही. सर्व नगरसेवकांच्या सहकार्याने नागपूर महानगरपालिकेत पक्षाची नवी ओळख आणि दबदबा निर्माण करण्याचा आमचा प्रयत्न राहील. आपल्या कार्यकाळात पाणी आणि शिक्षण हे दोन विषय लावून धरू, असे त्यांनी सांगितले. अन्य मान्यवरांनीही यावेळी आपले विचार मांडले. कार्यक्रमाचे संचालन नगरसेवक जितेंद्र घोडेस्वार यांनी केले. आभार जिल्हाध्यक्ष विलास सोमकुंवर यांनी मानले.

# थोडक्यात...

## ‘रेन वाटर हार्वेस्टिंग’बाबत मोठ्या प्रमाणात जनजागृती आवश्यक :महापौर नंदा जिचकार

### तज्ज्ञ जाणकार व स्वयंसेवी संस्थांची मनपामध्ये बैठक

शहरात उद्भवलेली पाणी टंचाई ही गंभीर बाब आहे. भविष्याच्या दृष्टीने ही धोक्याची घंटा असून याबाबत आताच प्रत्येकाने आपली जबाबदारी ओळखणे आवश्यक आहे. पाण्याचा अवास्तव वापर आणि आपली रोजची सवय याचा फटका आज आपल्याला बसत आहे. भविष्यात ही समस्या उद्भवू नये यासाठी पावसाच्या पाण्याचे संवर्धन करणे ही गरज झाली आहे. ‘रेन वाटर हार्वेस्टिंग’ प्रणाली प्रत्येक सरकारी कार्यालय, खेळाचे मैदान, उद्यान, मोठ्या इमारती यासोबतच नागरिकांनी आपल्या घरीही लावावी यासाठी मोठ्या प्रमाणात जनजागृती करण्याची गरज आहे, असे प्रतिपादन महापौर नंदा जिचकार यांनी केले.‘रेन वाटर हार्वेस्टिंग’ संदर्भात चर्चा करून सूचना व नवसंकल्पना मागविण्यासाठी शुक्रवारी (ता.२६) महापौर नंदा जिचकार यांच्या अध्यक्षतेत जज्ज्ञ जाणकार व स्वयंसेवी संस्थांच्या प्रतिनिधींची बैठक आयोजित करण्यात आली होती. यावेळी ‘रेन वाटर हार्वेस्टिंग’ बाबतच्या तज्ज्ञांनी या प्रणालीची आवश्यकता आणि त्याच्या तंत्रज्ञानाची माहिती दिली. तर स्वयंसेवी संस्थांच्या प्रतिनिधींनी पाणी बचतीबाबतच्या आपल्या विविध संकल्पना व सूचना महापौरांकडे सादर केल्या.

## ‘रमाई’ योजनेतील रखडलेले प्रस्ताव तात्काळ मार्गी लावा : सभापती तारा यादव

### गलिच्छ वस्ती निर्मूलन व घरबांधणी समितीची बैठक

रमाई घरकुल योजना ही गरीबांसाठीची अत्यंत महत्त्वाकांक्षी योजना आहे. मात्र, या योजनेअंतर्गत लाभार्थ्यांनी सादर केलेले प्रस्ताव दोन–दोन वर्षांपासून रखडलेले आहेत. ते का रखडले याची कारणे शोधून सर्व प्रकरणे तात्काळ मार्गी लावा आणि पुढील काही दिवसांत लाभार्थ्यांना धनादेशाचे वितरण करा, असे निर्देश गलिच्छ वस्ती निर्मूलन व घरबांधणी समितीच्या सभापती तारा (लक्ष्मी) यादव यांनी दिले. याप्रसंगी बोलताना सभापती तारा यादव म्हणाल्या, समाजातील गरीब आणि गरजू लोकांसाठी शासनाच्या विविध योजना आहेत. प्रत्येकाला आपले हक्काचे घर असावे असे वाटते. त्यानुसार, शासनाने रमाई घरकुल योजना, पंतप्रधान आवास योजना, मालकी हक्काचे पट्टे वाटप अशा विविध योजना आणल्या आहेत. या योजनांच्या माध्यमातून लाभ मिळावा यासाठी अनेकांनी अपेक्षेने नियमानुसार अर्ज केले आहेत. मात्र, अर्ज करूनही लाभार्थ्यांना अद्यापही योजनांचा लाभ मिळाला नसल्याच्या तक्रारी आपल्याकडे आल्याचे त्यांनी सांगितले. रमाई आवास योजनेतील रखडलेल्या सर्व प्रकरणातील त्रुट्या तातडीने दूर करून धनादेश वाटपाचा मार्ग मोकळा करण्याचे निर्देश त्यांनी दिले. धनादेश हे झोनस्तरावर न करता मुख्यालयात पदाधिकाऱ्यांच्या उपस्थित क्रमानुसार धनादेश वाटप करण्याचे निर्देशही त्यांनी दिले. पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत ज्यांनी अर्ज सादर केले आहेत, त्यांना किमान अर्जाच्या सद्यस्थितीची माहिती देण्यात यावी. पुढील महिन्यात निवडणूक आचारसंहिता लागत असल्याकारणाने मालकी हक्क पट्टे वाटपाच्या कार्यवाहीला वेग देण्याचेही निर्देश त्यांनी यावेळी दिले.

## अग्निशमन कर्मचाऱ्यांच्या भरतीसाठी घेणार सभागृहातून मान्यता

### अपुऱ्या कर्मचाऱ्यांच्या समस्येवर तोडगा : शासनाकडेही करणार पाठपुरावा

नागपूर महानगरपालिकेतील अग्निशमन विभागात अपुऱ्या कर्मचारी वर्गामुळे अनेक अडचणी येतात. कर्मचारी भरतीचा विषय महत्त्वाचा असून शासनाकडे कायमस्वरूपी भरतीकरिता पाठपुरावा सुरू आहे. मात्र शहरातील आठ स्थानकांमध्ये किमान आवश्यकतेनुसार भरतीसाठी सेवाप्रवेश नियमाप्रमाणे सभागृहातून मंजुरी घेण्यात येईल. तसा प्रस्ताव अग्निशमन विभागाने सामान्य प्रशासन विभागाच्या माध्यमातून सभागृहाकडे पाठवावा, असे निर्देश अग्निशमन व विद्युत समितीचे सभापती ड. संजयकुमार बालपांडे यांनी दिले. बैठकीत कर्मचारी भरतीच्या मुद्यावर सांगोपांग चर्चा झाली. कर्मचारी वर्ग अपुरा असल्यामुळे आपत्तीच्या समयी मोठी अडचण येऊ शकते. कर्मचारी भरतीचा प्रस्ताव शासनाकडे आहे. त्याचा तातडीने पाठपुरावा करणे आवश्यक असल्याचे मुख्य अग्निशमन अधिकारी राजेंद्र उचके यांनी सांगितले. यावर त्या प्रस्तावाचा पाठपुरावा करू. सोबतच तातडीने भरती करण्यासाठी ठराव क्र. १५५ आणि सेवाप्रवेश नियमावलीच्या अधीन राहून सभागृहाची मंजुरी घेण्यात येईल, त्यासाठी प्रस्ताव तातडीने पाठविण्याचे निर्देश सभापती ड. बालपांडे यांनी दिले. यावेळी विविध विषयांवरही चर्चा करण्यात आली. गणवेश नियमावलीमध्ये सुधारणा करण्यावरही यावेळी चर्चा करण्यात आली. शासनाने ठरवून दिल्याप्रमाणे सुधारणा करावी, असे निर्देश सभापतींनी दिले. त्रिमूर्तीनगर अग्निशमन स्थानकाचे काम लांबले आहे. १५ ऑगस्ट रोजी त्या स्थानकाचे उद्घाटन होईल, यादृष्टीने तातडीने सर्व कार्यवाही पूर्ण करण्याचे निर्देश सभापती ड. संजयकुमार बालपांडे यांनी दिले.

## प्रत्येक झोनला एक ‘डॉग व्हॅन’ द्या...!

### आरोग्य सभापती वीरेंद्र कुकरेजा यांचे निर्देश

नागपूर शहरात कुत्रे आणि डुकरांचा त्रास प्रचंड वाढला आहे. यासंदर्भात नागरिकांच्या अनेक तक्रारी येतात. मात्र यंत्रणा अपुरी असल्यामुळे तक्रारींचा निपटारा करणे शक्य नाही. केवळ दोन ‘डॉग व्हॅन’च्या भरोशावर हे शक्य नसल्यामुळे प्रत्येक झोनमध्ये प्रत्येकी एक ‘डॉग व्हॅन’ असायलाच हवी, यासंदर्भात तातडीने प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश आरोग्य सभापती वीरेंद्र कुकरेजा यांनी दिले. बऱ्याच नाल्यांची सफाई आजही मनुष्यबळाद्वारे केली जाते. त्यामुळे या नाल्यांचीही सफाई मशीनने करता येईल यासाठी नाल्यांची रुंदी वाढविता येईल का, यादृष्टीने अभ्यास करून अहवाल तयार करण्यात यावा. यापुढे संपूर्ण नाल्यांची सफाई मशिनद्वारेच व्हावी यादृष्टीने चर्चा करण्यासाठी लवकरच विशेष बैठक बोलविण्यात येईल, असेही श्री. कुकरेजा यांनी सांगितले.नागपूर महानगरपालिकेअंतर्गत असलेली आरोग्य सेवा अद्ययावत करण्याचे प्रयत्न सुरू आहे. टाटा ट्रस्टच्या माध्यमातून २६ नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रांचा कायापालट करण्याचे कार्य सुरू आहे. त्यापैकी १७ आरोग्य केंद्रांचा कायापालट झाला असून येथे लाभ घेणाऱ्या रुग्णांची संख्या वाढली आहे. सदर येथील प्रयोगशाळेत सुमारे ४१ चाचण्या पूर्णत: आता मोफत होतात. आरोग्य यंत्रणा अधिकाधिक सक्षम करण्याच्या दृष्टीने अधिकाऱ्यांनीही तत्पर राहावे, असे आवाहन आरोग्य सभापती वीरेंद्र कुकरेजा यांनी यावेळी केले.शहरातील १४ दहनघाटांपैकी अंबाझरी घाटावर दहनासाठी ‘ब्रिकेटस’ उपलब्ध आहेत. भविष्यात मोक्षधाम, मानकापूर, सहकार नगर, गंगाबाई घाट आणि मानेवाडा येथेही ‘ब्रिकेटस’ उपलब्ध करून देण्याचा प्रस्ताव आहे. त्याला गती देण्याचे निर्देशही सभापती कुकरेजा यांनी दिले. गणपती विसर्जनाच्या वेळी कृत्रिम रबर टँक लावले जातात. परंतु ते एक–दोन वर्षेच कामात येतात. त्यापेक्षा सर्वच ठिकाणी सेंट्रींगचे कृत्रिम टँक उभारण्यात यावे. त्यादृष्टीने तयारी करण्याचे निर्देशही त्यांनी दिले. नाला गँगला लवकरच सुरक्षा कीट देण्यात येणार असून सफाई कर्मचाऱ्यांनाही ग्लोव्हज़ पुरविण्याचे निर्देश सभापतींनी दिले. मनपाअंतर्गत सुरू असलेल्या सर्व दवाखान्यांमध्ये अधिकारी–कर्मचाऱ्यांची हजेरी पुढील महिनाभरात बायोमेट्रिक पद्धतीने सुरू करण्याचे निर्देशही त्यांनी यावेळी दिले.कचरा ट्रान्सफर स्टेशनसाठी दहापैकी सहा झोनच्या जागा जवळपास निश्चित झाल्या आहेत. त्यासंदर्भातील कार्यवाहीला वेग देण्याचे निर्देशही सभापतींनी दिले.बैठकीत आरोग्य अधिकारी (स्वच्छता) डॉ. सुनील कांबळे यांनी त्यांच्या विभागामार्फत सुरू असलेल्या कामांची माहिती दिली. सध्या असलेले सफाई कर्मचारी, ऐवजदार, बीट या यंत्रणेमार्फत सुरू असलेल्या कामाचे स्वरूप, भांडेवाडी डम्पिंग यार्डमध्ये टाकण्यात येणारा कचरा, त्यावर होणारी प्रक्रिया आदींविषयीही त्यांनी सांगितले. आरोग्य अधिकारी (दवाखाने) डॉ. सरीता कामदार यांनी नागपूर महानगरपालिकेअंतर्गत शहरात असलेल्या दवाखान्यांची माहिती, कामाचे स्वरूप आदींविषयी माहिती दिली

# अर्थ डे नेटवर्कच्या स्पर्धेत नागपूरला पुरस्कार

### विजेत्या दहा शहरांची यादी घोषित : मनपा आणि ग्रीन व्हिजीलला बहुमान



पर्यावरण संरक्षणासाठी जगभरात कार्यरत असलेल्या अर्थ डे नेटवर्कच्या माध्यमातून भारतातील शहरांसाठी ‘शहर ग्रीन करो’ या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. १० लाखाच्या वर लोकसंख्या असलेल्या देशातील एकूण ४९ शहरांचा सहभाग असलेल्या या स्पर्धेत नागपूर शहराचा समावेश विजेत्या उत्कृष्ट दहा शहरांमध्ये झाला आहे. नागपूरसह महाराष्ट्रातील दोन शहरांचा या यादीत समावेश असून नागपूरपाठोपाठ मुंबई शहरानेही यात स्थान पटकाविले आहे.पर्यावरण संरक्षणासाठी ‘अर्थ डे नेटवर्क’ नामक आंतरराष्ट्रीय संस्था सन १९७० पासून कार्यरत आहे. वॉशिंग्टन डी.सी. या शहरात मुख्यालय असलेल्या संस्थेसोबत १९२ देशातील सुमारे ७५ हजार भागीदार संस्था जुळलेल्या आहेत. सुमारे एक बिलियन सदस्य यामाध्यमातून पर्यावरणविषयक कार्यात जुळलेले आहेत. वसुंधरा वाचविण्याचा संदेश देत वर्षभर पर्यावरणविषयक जनजागृतीचे उपक्रम जगभरात राबविले जातात. याच संस्थेच्या माध्यमातून नागपुरात नागपूर महानगरपालिका आणि ग्रीन व्हिजील फाऊंडेशन वर्षभर पर्यावरणविषयक जनजागृतीसंदर्भात उपक्रम राबवित असतात. ऊर्जा बचतीसाठी पौर्णिमा दिवस, शहर स्वच्छतेसाठी स्वच्छता अभियान, ओला आणि सुका कचरा विलगीकरण, प्लास्टिकमुक्ती, हरितम् नागपूर (वृक्षारोपण) आणि पर्यावरण शिक्षण आदी पर्यावरणाशी संबंधित उपक्रम राबविले जातात. यावर्षी नागपूर महानगरपालिकेने झाडांचे डी–चोकींग करण्यावर विशेष भर दिला. सोबतच झाडे किंवा झाडांच्या फांद्या कापण्यासंदर्भात विशेष धोरण तयार करण्यात आले. दोन वर्षांपूर्वी अर्थ डे नेटवर्क या संस्थेला ४७ वर्ष पूर्ण झाल्याच्या निमित्ताने ‘शहर ग्रीन करो’ ही स्पर्धा सुरू करण्यात आली. त्यावर्षी ४७ शहरांसाठी, मागील वर्षी ४८ शहरांसाठी तर यावर्षी ४९ शहरांसाठी ही स्पर्धा होती. या स्पर्धेत देशातील मोठी शहरे सहभागी झाली होती. या प्रत्येक शहरांमध्ये स्थानिक पर्यावरण प्रेमी संस्थांनी अर्थ डे नेटवर्कच्या माध्यमातून विविध उपक्रम राबविले. ज्या शहरातील उपक्रमांची व्याप्ती मोठी होती, त्या उपक्रमांच्या माध्यमातून प्रभावी जनजागृती झाली, या जनजागृतीचा लोकजीवनावर प्रभाव पडला अशा दहा शहरांना ‘शहर ग्रीन करो’ स्पर्धेचे विजेता घोषित करण्यात आले.

## लसीकरणाचा वेग वाढवा : अतिरिक्त आयुक्त राम जोशी

### टास्क फोर्सची बैठक : लसीकरण कार्यक्रमाचा घेतला आढावा



नवजात शिशु आणि प्रत्येक बालकाला लसीकरण झाले पाहिजे यासाठी यंत्रणेने दक्ष राहायला हवा. कुठलाही बालक लसीकरणापासून वंचित राहू नये, याची काळजी घेत लसीकरण कार्यक्रमाचा वेग वाढवा, असे निर्देश अतिरिक्त आयुक्त राम जोशी यांनी दिले.शासनाच्या निर्देशानुसार शहरात आयोजित लसीकरण कार्यक्रमाची योग्य अंमलबजावणी व्हावी यासाठी नेमण्यात आलेल्या विशेष टास्क फोर्सची बैठक गुरुवारी (ता. २५) मनपा मुख्यालयातील आयुक्त कक्षात अतिरिक्त आयुक्त राम जोशी यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. याप्रसंगी ते बोलत होते. सदर बैठकीत अतिरिक्त आयुक्त राम जोशी यांनी शहरात सुरू असलेल्या लसीकरण मोहिमेचा आढावा घेतला. लसीकरणाचे प्रमाण वाढविण्यात यावे. खासगी वैद्यकीय व्यावसायिकांकडून लसीकरणाची नोंद घेण्यात यावी, लसीकरण सत्राला वैद्यकीय अधिकाऱ्यांनी भेट द्यावी. लसीकरण सत्र रद्द होऊ नये याची काळजी घेण्यात यावी. कुणीही बालक लसीकरणापासून वंचित राहू नये, त्याचे संपूर्ण लसीकरण व्हावे यासाठी लाभार्थ्यांची यादी तयार करण्याचे निर्देश यावेळी अतिरिक्त आयुक्त राम जोशी यांनी दिले. बाळ जन्मल्यानंतर २४ तासाच्या आत द्यावयाची कावीळ आणि पोलिओची लस दिली जात नसल्याबद्दल यावेळी चिंता व्यक्त करण्यात आली.आता धनुर्वात लसीच्या ठिकाणी नवीन धनुर्वात व घटसर्प ही लस सुरू करण्यात आली आहे. रोटा वायरस ही लस केवळ खासगी दवाखान्यात उपलब्ध राहायची. आता त्याचेही लसीकरण मनपा व अन्य शासकीय रुग्णालयात यापुढे उपलब्ध राहील, अशी माहिती लसीकरण अधिकारी डॉ. जी. एस. नवखरे यांनी दिली. आरोग्य अधिकारी (दवाखाने) डॉ. सरीता कामदार यांच्या मार्गदर्शनात संपूर्ण शहरात लसीकरण कार्यक्रम सुरू असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

## पाणी कपातीत एक महिना वाढ

### पदाधिकारी–अधिकाऱ्यांच्या बैठकीत निर्णय

नागपूर शहर आणि नागपूर शहराला पाणी पुरवठा करणाऱ्या नवेगाव खैरी क्षेत्रात पावसाने दडी मारल्याने नागपूर शहरावर पिण्याच्या पाण्याचे संकट आले आहे. यातून मार्ग काढण्यासाठी आठवड्यापूर्वी घेण्यात आलेल्या पाणी कपातीच्या निर्णयाला तूर्त एक महिना वाढविण्यात आले आहे. २२ ऑगस्टपर्यंत पाणी कपात कायम राहणार असून आठवड्यातून केवळ चार दिवसच नागपूरकरांना पिण्याचे पाणी मिळणार आहे.पाणी कपातीचा निर्णय एक आठवड्यासाठी घेण्यात आला.बैठकीला उपमहापौर दीपराज पार्डीकर, स्थायी समिती सभापती प्रदीप पोहाणे, प्रभारी आयुक्त रवींद्र ठाकरे, जलप्रदाय समितीचे सभापती पिंटू झलके, उपसभापती भगवान मेंढे, अतिरिक्त आयुक्त राम जोशी, जलप्रदाय विभागाच्या कार्यकारी अभियंता श्वेता बॅनर्जी, अधीक्षक अभियंता मनोज तालेवार, कार्यकारी अभियंता मनोज गणवीर, ओसीडब्ल्यूचे सीईओ रॉय, के.एम.पी. सिंग उपस्थित होते.सदर बैठकीत नागपूर शहरात पाणी कपात करण्यात आल्यानंतर पाणी पुरवठ्यात आलेल्या अडचणी, नागरिकांच्या तक्रारी, दूषित पाण्याची समस्या, नागरिकांची भूमिका आदींची समीक्षा करण्यात आली. प्रभारी आयुक्त रवींद्र ठाकरे आणि जलप्रदाय समितीचे सभापती पिंटू झलके यांनी मनपा जलप्रदाय विभागाच्या दहाही झोनअंतर्गत कार्य करणाऱ्या डेलिगेटस्कडून पाणी पुरवठ्यासंदर्भातील झोननिहाय स्थिती जाणून घेतली. जेथून नागरिकांच्या तक्रारी आल्या तेथे काय उपाययोजना करण्यात आली, याची माहितीही जाणून घेतली.

### १२६० दशलक्ष घनमीटर पाण्याची बचत

१५ जुलैला पाणी कपातीचा निर्णय घोषित करण्यात आला. १७ जुलै, १९ जुलै आणि २१ जुलै रोजी शहरातील नागरिकांना पाणी देण्यात आले नाही. केवळ चार दिवस पाणी पुरवठा करण्यात आला. पूर्वी नवेगाव खैरी जलाशयातून सरासरी ५०० दशलक्ष घनमीटर पाण्याची उचल करण्यात येत होती. पाणी कपातीच्या निर्णयानंतर ती सरासरी ३२० दशलक्ष घनमीटर झाली. अर्थात दर दिवशी १८० दशलक्ष घनमीटर पाण्याची उचल कमी करण्यात आली. यानुसार सात दिवसात १२६० दशलक्ष घनमीटर पाण्याची बचत करण्यात आल्याची माहिती जलप्रदाय विभागाच्या कार्यकारी अभियंता श्वेता बॅनर्जी यांनी



## पदग्रहण समारंभ

### क्रीडा समिती सभापती प्रमोद चिखले यांनी स्वीकारला पदभार

नागपूर महानगरपालिकेचे नवनिर्वाचित क्रीडा समिती सभापती प्रमोद चिखले यांनी सोमवारी (ता.१५) पदभार स्वीकारला. मनपा मुख्यालयातील क्रीडा समिती सभापतींच्या कक्षापुढील बॅडमिंटन कोर्टच्या आवारात आयोजित पदग्रहण समारंभाला प्रमुख अतिथी म्हणून महापौर नंदा जिचकार, उपमहापौर दीपराज पार्डीकर, स्थायी समिती सभापती प्रदीप पोहाणे, सत्तापक्ष नेते संदीप जोशी प्रामुख्याने उपस्थित होते. यावेळी बोलताना महापौर नंदा जिचकार म्हणाल्या, क्रीडा समिती ही महत्वाची समिती आहे. शहरात क्रीडा विषयक वातावरण निर्माण करण्यासाठी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्यामार्फत विशेष प्रयत्न केले जात आहेत. खासदार क्रीडा महोत्सवाच्या माध्यमातून अनेक उदयोन्मुख खेळाडूंना व्यासपीठ मिळाले आहे. नागपूर शहरातील अनेक प्रतिभावंत खेळाडूंना हक्काचे व्यासपीठ मिळवून देण्यासाठी क्रीडा समितीतर्फे प्रयत्न करण्यात यावेत. मावळते क्रीडा समिती सभापती यांनी क्रीडा समितीच्या माध्यमातून शहरात क्रीडा वातावरण निर्माण करण्यासाठी अनेक महत्वाचे कार्य केले आहेत. हे कार्य पुढे चालू राहावे यासाठी प्रयत्न करण्यात यावेत, अशी अपेक्षा महापौर नंदा जिचकार यांनी व्यक्त केली.

## बोखारा फाटा–बर्डी बससेवेचे उद्घाटन



प्रभाग ११ अंतर्गत येणाऱ्या रजत हाईट, शिवकृष्ण धाम, संत ज्ञानेश्वर सोसायटीसह स्थानिक महिलांच्या मागणीनुसार परिवहन समितीचे सभापती जितेंद्र (बंटी) कुकडे यांच्या निर्देशानार नागपूर महानगरपालिका परिवहन विभागाच्या वतीने मंगळवारी (ता. ३०) बोखारा फाटा–बर्डी बससेवेचे उद्घाटन महिला व बालकल्याण समितीच्या सभापती संगीता गिऱ्हे यांच्या हस्ते पार पडले. यावेळी परिवहन विभागाचे अधिकारी रामराव मातकर, डिम्टस्चे अधिकारी हेमंत कावडे, डेपो अधिकारी सागर पाध्ये उपस्थित होते. अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, पूर्वी बर्डीहून ओमनगरपर्यंत बससेवा होती. याच सेवेचा विस्तार करण्यात आला असून आता सदर बस कोराडी रोड अंडर ब्रीज, वॉक्स कुलर फॅक्टरी, रजत हाईटपर्यंत येईल.



## शिक्षण विभागाचा चेहरामोहरा बदलविण्याचा संकल्प

### शिक्षण सभापतींनी घेतला मुख्याध्यापकांचा वर्ग : जाणून घेतली माहिती

संपूर्ण शिक्षण विभागाची कार्यप्रणाली, शाळांची सद्यस्थिती, विद्यार्थी–पालकांची भूमिका आणि शिक्षकांचे प्रयत्न जाणून घेण्यासाठी शिक्षण सभापती प्रा. दिलीप दिवे यांनी ३ ते १९ जुलैदरम्यान दहाही झोनअंतर्गत येणाऱ्या शाळांमधील मुख्याध्यापकांचा वर्ग घेतला. मुख्याध्यापकांकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे चालू शैक्षणिक सत्रात मनपाच्या शिक्षण विभागाचा चेहरामोहरा बदलविण्याचा संकल्पच या माध्यमातून सभापतींनी केला. मनपाच्या सर्व शाळांची माहिती शिक्षण विभागाला माहिती व्हावी आणि गरजेनुसार संबंधित शाळांमध्ये, शिक्षकांमध्ये बदल करण्यात यावे, या हेतूने मुख्याध्यापकांच्या बैठकांचे आयोजन करण्याचे निर्देश शिक्षण सभापती प्रा. दिलीप दिवे यांनी दिले होते. त्या अनुषंगाने झोननिहाय मुख्याध्यापकांच्या बैठका घेण्यात आल्या. यामध्ये सभापतींनी मुख्याध्यापकांकडून काही मुद्यांच्या आधारावर माहिती जाणून घेतली. ‘असर’ सर्वेक्षण अहवालाअंतर्गत शाळेचा शैक्षणिक दर्जा, शाळांमधील भौतिक असुविधा, मागील वर्षीची आणि चालू शैक्षणिक सत्रातील पटसंख्या आणि शिक्षकांची संख्या आदींबाबत सभापती प्रा. दिलीप दिवे यांनी प्रत्यक्ष मुख्याध्यापकांकडून माहिती जाणून घेतली. या माहितीच्या आधारे चालू शैक्षणिक सत्रात मुख्याध्यापकांनी शाळांत कोणकोणते बदल करायचे, याबाबत सभापतींनी सूचना केल्या. याच आधारावर आता पुढील सत्रातील शैक्षणिक वाटचाल ठरणार आहे. दहाही झोनमध्ये झालेल्या बैठकीचा सारांश सांगत मुख्याध्यापकांनी मनावर घेतले तर आश्चर्यकारकरीत्या शिक्षण विभागात बदल घडून येऊ शकतो, असे म्हणत शाळांमध्ये असलेल्या भौतिक असुविधा तातडीने दूर करण्यात येईल, असा विश्वास त्यांनी दिला. वीज, पाणी आणि स्वच्छतेच्या संदर्भात मुख्याध्यापकांनी स्वत: झोन सभापती आणि सहायक आयुक्तांशी संपर्क साधून त्या समस्या सोडवून घ्यावा, असे निर्देश दिले. शिक्षणाधिकारी प्रिती मिश्रीकोटकर यांनी प्रास्ताविकातून मुख्याध्यापक बैठक आयोजनासंदर्भात भूमिका विषद केली. समारोपीय बैठकीला लकडगंज झोनअंतर्गत येणाऱ्या शाळांचे मुख्याध्यापक उपस्थित होते.

## मनपातील अतिरिक्त शिक्षकांची यादी शासनाकडे पाठविणार

### शिक्षण सभापती प्रा. दिलीप दिवे यांची माहिती : शाळांच्या ‘डिजीटलायझेशन’वर भर

मनपा शाळांतील विद्यार्थ्यांची संख्या लक्षात घेता सध्या असलेले काही शिक्षक अतिरिक्त आहेत. ज्या शाळांत विद्यार्थी संख्येच्या तुलनेत शिक्षक अतिरिक्त असतील अशा शिक्षकांची यादी तातडीने तयार करण्याचे निर्देश मनपाच्या शिक्षण समितीचे सभापती प्रा. दिलीप दिवे यांनी शिक्षण विभागाला दिले. शासनाने मागणी केल्यानुसार अशा अतिरिक्त शिक्षकांची यादी शासनाकडे पाठविणार असल्याची माहिती त्यांनी दिली.नुकत्याच आटोपलेल्या झोननिहाय मुख्याध्यापक सभेचा आढावा घेताना सभापती प्रा. दिलीप दिवे यांनी शाळांमधील सोयी–सुविधांबाबत मुख्याध्यापकांनी वेळोवेळी दक्ष राहणे आवश्यक असल्याचे सांगितले. स्वच्छता, विद्युत आणि पाणी यासंदर्भात झोनस्तरावर सहायक आयुक्तांना पत्र द्यावे. शाळांची रंगरंगोटी, स्वच्छतागृहे याबाबत तातडीने आराखडा तयार करण्याचे निर्देश दिले. मुख्याध्यापकांच्या बैठकीतून आलेल्या समस्या आणि सोयी सुविधांबाबत लवकरच आयुक्तांसोबत चर्चा करण्यात येईल व निर्णय घेण्यात येईल, अशी माहिती त्यांनी यावेळी दिली. ठरल्यानुसार शाळांमध्ये सुधारणा झाली नाही तर त्याची जबाबदारी मुख्याध्यापकांवरच निश्चित करण्यात येईल, असा इशारा त्यांनी यावेळी दिला. ‘असर’च्या सर्वेक्षणात ज्या शाळांचा निकाल ६० टक्क्यांपेक्षा कमी आहे त्या शाळांतील शिक्षकांना ‘कारणे दाखवा’ नोटीस देण्याचे निर्देशही सभापती प्रा. दिलीप दिवे यांनी दिले.शाळा निरिक्षकांनी प्रत्येक आठवड्याचा निरिक्षणाचा अहवाल शिक्षणाधिकाऱ्यांकडे सादर करण्याचे निर्देशही त्यांनी यावेळी दिले. यावेळी सभापतींनी विविध विषयांचा आढावा घेतला. पटसंख्या वाढविण्यासाठी शिक्षण विभागाचे अधिकारी आणि मुख्याध्यापक व शिक्षकांनी केलेले प्रयत्न, शालेय गणवेश वाटप, शालेय पाठ्यपुस्तके विद्यार्थ्यांना देण्याबाबत केलेल्या कार्याचा आढावाही त्यांनी यावेळी घेतला. नागपूर महानगरपालिकेच्या क्रीडा व सांस्कृतिक विभागातर्फे दरवर्षी घेण्यात येणाऱ्या ‘वंदे मातरम्’ गायन स्पर्धेत शहरातील प्रत्येक शाळांना पत्र पाठविण्याचे निर्देश सभापतींनी यावेळी दिले. शिक्षण विभागांतर्गत शालेय शैक्षणिक साहित्य खरेदी, इमारत बांधकाम, किरकोळ दुरुस्ती, शाळेत वापरात येणाऱ्या वस्तू व इतर खरेदी परस्पर न करता प्रथम समितीत विषय घेऊन मंजूर करण्याचे निर्देशही यावेळी सभापतींनी दिले.

### ‘डिजीटलायझेशन’वर भर

नागपूर महानगरपालिकेच्या सुमारे १४४ शिक्षकांना मागील वर्षी डिजीटल प्रशिक्षण देण्यात आले होते. आता मनपाच्या प्रत्येक शाळांमध्ये एक ‘डिजीटल वर्ग’ असावा, यादृष्टीने प्रस्ताव तयार करण्याचे निर्देश सभापती प्रा. दिलीप दिवे यांनी दिले. निधीच्या उपलब्धतेप्रमाणे किमान १०० शाळा पहिल्या टप्प्यात डिजीटल करण्याचे निर्देश त्यांनी यावेळी दिले. डिजीटल वर्गामध्ये प्रशिक्षण घेतलेल्या शिक्षकांचा अहवालही सभापतींनी मागविला.